# Stop Diarrhoea Campaign (SDC) 2025 राबविण्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना
# ०२ जून २०२५ ते ३१ जूलै २०२५

- **SDC चे ध्येय**
  - ✓ अतिसारामुळे होणारे बालमृत्यू शून्यावर पोहोचविणे हे अंतिम ध्येय आहे.
- **SDC चे ध्येयचे घोषवाक्य**

" अतिसारावर करा मात, स्वच्छता आणि ओआरएस ची घेऊनी साथ"

- **SDC ची उद्दिष्टे-** SDC ही उन्हाळा व पावसाळा या हंगामामध्ये पूर/ नैसर्गिक आपत्ती दरम्यान अतिसाराच्या संभाव्य घटनांना सामोरे जाण्यासाठी एक प्रकारची पूर्वतयारी आहे. याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

✓ अतिसार असलेल्या सर्व मुलांकरीता ORS आणि झिंक चे वाटप होईल व त्यांच्यापर्यंत ते पोहोचेल हे सुनिश्चित करणे.

✓ पाच वर्षांखालील मुलांच्या अतिसार प्रतिबंध आणि व्यवस्थापनासाठी पालकांचे/काळजी घेणाऱ्यांचे योग्य समुपदेशन करणे

✓ अति जोखमीचे क्षेत्र (झोपडपट्टया, वीटभट्टी व पूरग्रस्त भाग) आणि दुर्बल घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करणे.

- **धोरणः**

✓ पाच वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या बालकांच्या घरामध्ये ओआरएस व झिंक चा वापर तसेच उपलब्धता वाढवणे.

✓ अतिसारासह जलशुष्कता असलेल्या बाल रुग्णांचे व्यवस्थापन करण्यासाठी आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करणे.

✓ अतिसाराचा प्रतिबंध व नियंत्रण करण्याकरिता त्याविषयी प्रचार, प्रसार व संवाद या बाबींवर भर देणे.

✓ शहरी झोपडपट्टया, पूरग्रस्त भाग, आरोग्य सेविका कार्यरत नसलेली उपकेंद्रे, भटक्या जमाती, वीटभट्टी कामगार, स्थलांतरीत मजूर आणि बेघर मुले इत्यादी यांसारख्या जोखीमग्रस्त घटकांवर विशेष लक्ष देणे.

✓ मागील २ वर्षात अतिसाराची साथ असलेले क्षेत्र व पाणीपुरवठा व स्वच्छतेचा अभाव असलेले क्षेत्र यावर विशेष लक्ष देणे.

✓ प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी महिला व बाल विकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग व शिक्षण विभाग या विभांगासोबत व इतर भागीदारांसोबत समन्वय साधणे.

# Stop Diarrhoea Campaign चे वेळापत्रक

| अ. क्र. | विषय | कालमर्यादा |
|---|---|---|
| **पुर्वतयारीचे वेळापत्रक ०२ जून ते १५ जून २०२५** | | |
| १ | जिल्हास्तरीय / महानगरपालिका स्तरीय सुकाणू समिती स्थापन करणे व बैठक घेणे | १०/०६/२०२५ पर्यंत |
| २ | ओआरएस / झिंक स्टॉक अद्ययावत करणे | ०५/०६/२०२५ पर्यंत |
| ३ | जिल्हा/ महानगरपालिका स्तरीय वैदयकीय अधिकारी यांची एक दिवसीय सभा व प्रशिक्षण सत्र | १०/०६/२०२५ पर्यंत |
| ४ | प्राथमिक आरोग्य केंद्र / नागरी आरोग्य केंद्र स्तरीय सभा व प्रशिक्षण सत्र | ११/०६/२०२५ ते १५/०६/२०२५ |
| ५ | गृहभेटी व अहवाल नमुन्यांची छपाई व वितरण | १०/०६/२०२५ पर्यंत |
| ६ | गृहभेटी व मोबाईल टीम च्या भेटींचा सुक्ष्म कृती आराखडा तयार करणे | १२/०६/२०२५ पर्यंत |
| ७ | ओआरएस / झिंक स्टॉकचे वितरण करणे | १३/०६/२०२५ पर्यंत |
| ८ | खाजगी वैदयकीय व्यावसायिक यांचे Stop Diarrhoea Campaign विषयावरील प्रशिक्षण | १२/०६/२०२५ पर्यंत |
| ९ | सर्व आरोग्य संस्थांमध्ये ओआरएस व झिंक कॉर्नरची स्थापना | १५/०६/२०२५ पर्यंत |
| **Stop Diarrhoea Campaign प्रत्यक्ष अंमलबजावणी** | | |
| | Stop Diarrhoea Campaign चे उद्घाटन | १६/०६/२०२५ रोजी |
| १ | • आशा व्दारे गृहभेटी मध्ये ओआरएस व झिंक चे प्रात्यक्षिक व वितरण<br>• जनजागृती व प्रसिध्दी<br>• उपचार व संदर्भ सेवा<br>• शाळा व अंगणवाडी मध्ये हात धुण्याचे प्रात्यक्षिक<br>• व्हीएचएसएनडी सभा<br>• साप्ताहिक अहवाल - दर सोमवारी<br>• सनियंत्रण व मुल्यमापन | १६/०६/२०२५ ते ३१/०७/२०२५ पर्यंत |
| २ | अंतिम अहवाल सादरीकरण | ०५/०८/२०२५ |

## जिल्हास्तरीय सुकाणू समितीची स्थापना करणेः-

या कार्यक्रमाच्या व्यवस्थापन व अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात यावी. या कार्यक्रमामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाबरोबरच, महिला बाल विकास विभाग, शिक्षण व पाणी पुरवठा या विभागांचाही समावेश करण्यात यावा. तसेच आयएपी (IAP), आयएमए (IMA) अशासकिय संस्था यांचा समावेश करावा. या समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | उपाध्यक्ष |
| ३) | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम विकास विभाग, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५) | जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय | सदस्य |
| ६) | वैद्यकिय महाविद्यालय, विभाग प्रमुख, बालरोग | सदस्य |
| ७) | जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद | सदस्य |
| ८) | जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक) | सदस्य |
| ९) | जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद (माध्यमिक) | सदस्य |
| १०) | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) | सदस्य |
| ११) | स्थानिक आयएमए प्रतिनिधी | सदस्य |
| १२) | स्थानिक आयएपी प्रतिनिधी | सदस्य |
| १३) | स्थानिक निमा (NIMA) प्रतिनिधी | सदस्य |
| १४) | स्थानिक खाजगी वैदयकीय व्यावसायिक (General Practitoner) | सदस्य |
| १५) | जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| १६) | जिल्हा प्रजनन व बालआरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

## महानगरपालिका स्तरीय सुकाणू समितीची स्थापना करणेः-

या कार्यक्रमाच्या व्यवस्थापन व अंमलबजावणीसाठी महानगरपालिका स्तरीय समिती स्थापन करण्यात यावी. या कार्यक्रमामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाबरोबरच, महिला बाल विकास विभाग, शिक्षण व पाणी पुरवठा या विभागांचाही समावेश करण्यात यावा. तसेच आयएपी (IAP), आयएमए (IMA) अशासकिय संस्था, यांचा समावेश करावा. या समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १) | आयुक्त महानगरपालिका | अध्यक्ष |
| २) | उपायुक्त - महानगरपालिका | उपाध्यक्ष |
| ३) | उपायुक्त - नगरविकास विभाग,महानगरपालिका | उपाध्यक्ष |
| ४) | शहरी बाल विकास प्रकल्प अधिकारी महानगपालिका | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५) | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) | सदस्य |
| ६) | वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| ७) | शिक्षण अधिकारी, महानगरपालिका. | सदस्य |
| ८) | स्थानिक आयएमए, प्रतिनिधी. | सदस्य |
| ९) | स्थानिक आयएपी, प्रतिनिधी. | सदस्य |
| ११) | स्थानिक निमा (NIMA) प्रतिनिधी | सदस्य |
| १२) | स्थानिक खाजगी वैदयकीय व्यावसायिक (General Practitoner) | सदस्य |
| १३) | जनसंपर्क अधिकारी, महानगरपालिका. | सदस्य |
| १४) | वैद्यकिय महाविद्यालय, विभाग प्रमुख, बालरोग | सदस्य |
| १५) | अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १६) | महानगरपालिका प्रजनन व बालआरोग्य अधिकारी, | सदस्य सचिव |

## तालुका स्तरीय सुकाणू समिती स्थापन करणेः-

Stop Diarrhoea Campaign राबविण्यासाठी तालुकास्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात यावी. या कार्यक्रमामध्ये आरोग्य विभागाबरोबरच महिला बाल विकास, शिक्षण विभाग व पाणी पुरवठा या विभागांचाही समावेश करण्यात यावा. या समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १) | गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| २) | वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय. | सदस्य |
| २) | आरोग्य अधिकारी, नगरपालिका | सदस्य |
| ३) | गट शिक्षण अधिकारी. | सदस्य |
| ४) | ब्लॉक रिसोर्स सेंन्टर (BRC) चे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | बाल विकास प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| ६) | वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, (सर्व) | सदस्य |
| ७) | तालुका आरोग्य अधिकारी. | सदस्य सचिव |

## ओआरएस व झिंक साठयाचे वाटप

सर्वस्तरावर ओ.आर.एस. व झिंक गोळयांचा औषधी साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याची खात्री करावी. ज्या ठिकाणी ओआरएस व झिंक गोळया उपलब्ध नसतील त्या ठिकाणी त्वरीत व वेळेत साठा उपलब्ध करुन देण्यात यावा. ओआरएस व झिंक साठयाचे वाटप हे खालीलप्रमाणे करण्यात यावे.

### ओआरएस व झिंक गोळीच्या वाटपासाठी सुचना

- ५ वर्षाखालील एकूण बालकांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या १०% असते
- **प्रात्यक्षिक** – प्रत्येक आशाच्या कार्यक्षेत्राची लोकसंख्या १,००० ते १,५०० असून त्यामध्ये २०० ते ३०० घरे असतात. यानुसार आशाच्या कार्यक्षेत्रात ५ वर्षाखालील बालकांची संख्या १३० ते १५० असते. त्यानुसार ओआरएस बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी प्रति आशा साधारणतः १५ ते २० पाकीटांची आवश्यकता असते (प्रत्येक ७ ते १० घरांसाठी १ पाकीट) तसेच झिंक गोळयांच्या वापराबाबतचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी प्रति आशा साधारणतः २० झिंक गोळयांची आवश्यकता असेल.
- **उपचार** – अतिसार असलेले बालक आढळल्यास अतिसाराच्या उपचारासाठी प्रति बालक २ ओआरएस पाकीटे व १४ झिंकच्या गोळया आवश्यक असतात. त्यानुसार १० अतिसाराच्या बालकांसाठी २० ओआरएस पाकीटे व १४० झिंकच्या गोळया असणे आवश्यक आहे
- **उपरोक्त प्रात्यक्षिक व अतिसार उपचारासाठी प्रत्येक आशा स्वयंसेविकेस ५० ओआरएस चे पाकीट व १४० झिक च्या गोळया उपलब्ध करुन द्याव्यात.**
- **ओआरएस झिंक कॉर्नर** – आपल्या जिल्हयातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये तसेच अंगणवाडीच्या ठिकाणी ओआरएस झिंक कॉर्नरची स्थापना करावी. त्या ठिकाणी ओआरएस चे पाकीट व झिंक च्या गोळया उपलब्ध असाव्यात .
- या शिवाय सर्व आरोग्य संस्था तसेच आरोग्य कर्मचारी यांच्याकडे ओआरएस चे पाकीट व झिंक च्या गोळया मुबलक प्रमाणात उपलब्ध असाव्यात .

# तांत्रिक मार्गदर्शक सूचना :-

| सामाजिक स्तर | आरोग्य संस्थास्तर |
|---|---|
| **आशांमार्फत गृह भेटीचे नियोजन**<br>• आशांनी कार्यक्षेत्रातील सर्व घरांना भेटी दयावयाच्या आहेत.<br>• दुर्गम भाग, झोपडपट्टी, दुर्लक्षित, पुरग्रस्त व जोखीमग्रस्त भागातील बालकांवर प्राधान्याने लक्ष केंद्रीत करावे. (उदा. वीट भट्टी, ऊसतोडी इत्यादी)<br>• Stop Diarrhoea Campaign मध्ये गृहभेटींचा सुक्ष्म कृती आराखडा आशांकडे उपलब्ध असावा. त्याप्रमाणे त्यांनी ५ वर्षाखालील बालकांची यादी तयार करुन पुढील कार्यक्रमाचे नियोजन करावे.<br>**समुपदेशन**<br>• भेटीदरम्यान ओआरएसच्या वापराविषयी व आवश्यक स्वच्छतेविषयी समुपदेशन करावे. तसेच समुपदेशनासाठी एमसीपी कार्डचा वापर करावा.<br>• आशांनी सर्व कुटुंबीयांना निर्जंतुकीकरण व स्वच्छतेचे महत्व सांगावे.<br>• जे लाभार्थी गृहभेटी दरम्यान भेटु शकले नाहीत किंवा मोहीम कालावधीमध्ये बाहेर गावी गेले आहेत अशा लाभार्थ्यांना दूरध्वनीद्वारे समुपदेशन करावे.<br>• **HBNC, HBYC अशा इतर कार्यक्रमांतर्गत आशा स्वयंसेविका व आरोग्य सेविका द्वारे देण्यात येणाऱ्या गृहभेटींदरम्यान ओआरएस व झिंक च्या वापराविषयी जनजागृती करावी.**<br><br>**प्रात्यक्षिक**<br>• एका वस्तीत (गल्लीतील) १० ते १२ घरांमधील पालकांना ओआरएसचे द्रावण तयार करण्याचे व हात धुण्याचे प्रात्यक्षिक बैठक घेऊन दाखविण्यात यावे. तसेच प्रात्यक्षिक दाखविल्यानंतर पालकांना सर्व माहिती | **अतिसाराच्या उपचारासाठी ओआरएस व झिंक कॉर्नर स्थापन करणे -**<br>• ग्रामीण, शहरी, मनपा भागातील सर्व आरोग्य संस्थामध्ये बाहय रुग्ण विभागात (ओपीडी) व आंतररुग्ण (आयपीडी) विभागात ओआरएस आणि झिंक कॉर्नर स्थापन करुन कार्यान्वित करावेत. ओआरएस व झिंक कॉर्नर आणि ओपीडीमध्ये या विषयीचे सोबत जोडलेले ट्रिटमेंट प्रोटोकॉल (treatment protocols) खालील संस्थांमध्ये लावावेत.<br>➢ वैद्यकिय महाविद्यालय<br>➢ जिल्हा / उपजिल्हा/ ग्रामीण/स्त्री रुग्णालय,<br>➢ प्राथमिक आरोग्य केंद्र<br>➢ उपकेंद्र<br>➢ हेल्थ पोस्ट/हेल्थ सेंटर.<br>➢ आरोग्य वर्धीनी केंद्र<br>• सदर कॉर्नरमध्ये ओआरएसची पाकिटे व झिंकच्या गोळया उपलब्ध ठेवाव्यात. तसेच ओआरएसचे द्रावण तयार करण्याचे प्रात्यक्षिक करण्यासाठी आवश्यक उपकरणे उदा. स्वच्छ पातेले, वाटी, चमचा, वघराळे असावेत.<br>• ओआरएस झिंक कॉर्नरच्या ठिकाणी तसेच ओपीडीमध्ये प्रसिध्दी साहित्य दर्शनी भागात लावावेत.<br>• सर्व संस्थांमध्ये ओआरएस व झिंकचा पुरेसा साठा असावा.<br>• सर्व संस्थांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाकी व साठयांची स्वच्छता करावी. तेथे सर्व रुग्ण व कर्मचाऱ्याकरीता २४ तास स्वच्छ पाण्याचा पुरवठा |

| सामाजिक स्तर | आरोग्य संस्थास्तर |
|---|---|
| समजल्याची खात्री करावी.<br>**उपचार**<br>• आशांनी अतिसाराचे रुग्ण ओळखून उपचार तक्तयातील योजना अ प्रमाणे उपचार करावा.<br>• **गृहभेटी दरम्यान ५ वर्षाखालील अतिसार असलेल्या बालकांना २ ओआरएसचे पाकिट व १४ झिंक गोळया देण्यात याव्यात.**<br>**संदर्भ सेवा**<br>• आशांनी अतिसाराचे तीव्र जलशुष्कता असलेले रुग्ण ओळखून त्यांना आरोग्य संस्थेमध्ये संदर्भित करावे आणि मातांना धोक्याच्या लक्षणांबाबत सूचित करावे.<br>• या मोहिमे दरम्यान अतिसारामुळे झालेल्या बालमृत्यूबाबतची माहिती आशांनी वरिष्ठांना दयावी.<br>**सहाय्यक पर्यवेक्षण**<br>• गाव पातळीवरील कार्यक्रमाचे सनियंत्रण एएनएम ने करावे.<br>• **ओआरएस झिंक कॉर्नर स्थापन करणे –** प्रत्येक अंगणवाडी केंद्रामध्ये ओआरएस झिंक कॉर्नर स्थापन करण्यात यावेत. | होईल याची खात्री करावी.<br>• सर्व आरोग्य संस्थांमध्ये वापराचे व पिण्याचे पाणी योग्य गुणवत्तापूर्ण असलेची खात्री करावी.<br>• अतिसार झालेल्या सॅम बालकांना एनआरसी असलेल्या संस्थांमध्ये उपचाराकरिता संदर्भीत करावे<br>• सौम्य जलशुष्कता असलेल्या बालकांचे IMNCI PLAN –B नुसार व्यवस्थापन करावे<br>• तीव्र जलशुष्क्ता झालेल्या बालकांचे आयएमएनसीआय – प्लॅन सी च्या मार्गदर्शक सूचनानुसार व्यवस्थापन करण्यात यावे.<br>• अतिसाराच्या उपचाराच्या योग्य पध्दतीनुसार बालरुग्ण विभाग व बाहय रुग्ण विभागामध्ये प्रोटोकॉल व पोस्टर्स प्रदर्शित करावेत.<br>• लहान बालकांमधील अतिसाराच्या व्यवस्थापनेसाठी ओआरएस सोबत झिंक देण्यासाठी सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे.<br>• संस्था स्तरावर हात धुण्यासाठीची जागा व आवश्यक साधन सामुग्री ओआरएस / झिंक कोपऱ्यापासून जवळच असावी. |

## अतिजोखमीच्या क्षेत्राचे नियोजन / सुक्ष्म कृती आराखडा

Stop Diarrhoea Campaign अंतर्गत आरोग्य सुविधांचा अभाव असलेले क्षेत्र आणि समाजातील दुर्बल घटक यांचेवर विशेष लक्ष केंद्रित करावयाचे आहे. यामध्ये खालील क्षेत्रांचा समावेश होतो.

- आरोग्य सेविकेचे पद रिक्त असलेले उपकेंद्र किंवा आरोग्य सेविका ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रजेवर असणे.
- अस्वच्छ ठिकाणावरील लोकवस्ती
- अतिजोखमीचे क्षेत्र जसे की, शहरी झोपडपट्टी, अतिदुर्गम भाग, डोंगराळ भाग, आदिवासी क्षेत्र, पुरग्रस्त भाग, स्थलांतरीत वस्ती, भटक्या लोकांची वस्ती, वीटभट्टी, बांधकाम सुरु असलेले क्षेत्र, अनाथ बालके, तात्पुरत्या स्वरुपातील वस्ती, रस्त्यावर राहणारी बालके

- मागील २ वर्षात अतिसाराची साथ लागलेले क्षेत्र
- पाणीपुरवठा व स्वच्छतेचा अभाव असलेले क्षेत्र
- रेड कार्ड देण्यात आलेली गावे
- छोटी गावे, पाडा, तांडा, वस्ती, झोपडया इ.

  वर नमुद केलेल्या अतिजोखमीच्या क्षेत्राचा कृती आराखडा तयार करण्यात यावा. सदरील क्षेत्राची संपुर्ण बालकांना अतिसार उपचारासाठी ओआरएस व झिंक मिळेल हे सुनिश्चित करावे. याकरीता विशेष आरोग्य पथक नियुक्त करावे.

## अतिसार व्यवस्थापनासोबत स्वच्छतेविषयी समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सेविका यांचे कार्य:-

- Stop Diarrhoea Campaign अंतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सेविका यांनी उपकेंद्रामध्ये आणि ग्राम आरोग्य पोषण दिनी मातांना व काळजीवाहकांना विशेषतः ५ वर्षाखालील बालकांच्या मातांना अतिसाराचा प्रतिबंध आणि व्यवस्थापन विषयी माहिती देण्यात यावी.
- Stop Diarrhoea Campaign चे मुख्य घटक, अतिसारामध्ये ओआरएस व झिंकचे महत्व, स्तनपान सुरु ठेवणे, अतिसाराच्या प्रतिबंधासाठी हातांच्या स्वच्छतेचे महत्व आणि शौचाची विल्हेवाट लावण्यासाठी शौचालयाचा वापर या विषयी महत्वाचे संदेश दयावेत. तसेच बालकांमधील धोक्याच्या लक्षणांबाबतही माहिती दयावी.
- समुपदेशनासाठी एमसीपी कार्डचा वापर करावा.
- सदर कार्यक्रमासाठी गाव पातळीवरील सर्व कार्यकर्त्यांनी लसीकरण सत्र आणि ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता दिन या दिवशी जास्तीत जास्त लाभार्थ्यांचा सहभाग असेल याची दक्षता घ्यावी.

## Stop Diarrhoea Campaign दरम्यान व्हीएचएसएनसी ची बैठक आयोजित करणेबाबत

- समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सेविका यांनी Stop Diarrhoea Campaign दरम्यान आयुष्यमान आरोग्य मंदिर आरोग्य वर्धिनी सेंटर व व्हीएचएसएनडी ची गाव पातळीवर बैठक आयोजित करावी. सदर बैठकीस ५ वर्षांखालील बालके असलेल्या सर्व कुटुंबियांना उपस्थित राहण्यास प्रोत्साहीत करावे
- समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सेविका यांनी बैठकीमध्ये Stop Diarrhoea Campaign चे मुख्य घटक, अतिसारामध्ये ओआरएस व झिंकचे महत्व, स्तनपान सुरु ठेवणे, अतिसाराच्या प्रतिबंधासाठी हातांच्या स्वच्छतेचे महत्व आणि शौचाची विल्हेवाट लावण्यासाठी शौचालयाचा वापर या विषयी महत्वाचे संदेश एमसीपी कार्डचा वापर करुन दयावेत.
  - हाताच्या स्वच्छतेचे महत्व सांगण्यासाठी एएनएम आणि आशा यांनी साबण आणि पाण्याचा वापर करुन हात धुण्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवावे.
  - आरोग्य सेविकेने ओआरएस आणि झिंक चे द्रावण तयार करण्याचे प्रात्यक्षिक करुन दाखववावे. तसेच अतिसारामधील धोक्याची लक्षणे याबाबतची माहिती आयडीसीएफ टुलकीट वापरुन दयावी.

- ➢ कार्यक्षेत्रात बालकांमधील अतिसाराचे रुग्ण आढळल्यास त्यांना एएनएम किंवा आशा यांनी ओआरएस व झिंक दयावे किंवा तीव्र जलशुष्कता असल्यास तत्काळ संदर्भित करावे

- अतिसाराचे प्रमाण कमी करण्यासाठी गावातील उघडयावर शौचास जाणाऱ्या भागांची / ठिकाणांची निश्चिती करावी. तसेच तेथील समुदायास सदरील पध्दत बंद करण्यासाठी, व्हीएचएसएनसी सदस्य व पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने प्रोत्साहीत करावे.
- आरोग्य सेविका / आशा यांनी अतिसाराचे कारण असलेल्या दुषित पाणी व त्यामुळे होणारे विविध आजार जसे अतिसार, टायफाईड, जंत, पोटदुखी, उलटया याबाबत आवश्यक माहती दयावी.
- तसेच उघडयावरील शौच, त्यामुळे दुषित होणारे पाणी आणि परसणारे आजार हे एकमेकांशी संलग्न असून त्यांचे होणारे विपरीत परिणाम याबाबतही आशा / आरोग्य सेविका यांनी चित्राव्दारे माहीती दयावी.
- गावातील शौचालये न वापरणाऱ्या कुटुंबियाची टक्केवारी काढून त्यांना शौचालय वापरण्याचे ंमहत्व पटवून दयावे. तसेच सदरील भागातील पाण्याचे नमुने ग्रामपंचायतीमार्फत तपासणीकरीता पाठवावेत व त्याचे अहवाल सदर बैठकीत सादर करण्यात यावेत.
- अभियानाच्या दरम्यान सर्व गावांची पिण्याच्या पाण्याची तपासणी करुन घ्यावी.
- या वेळी समाजातील स्थानिक अधिकारी, जल जीवन मिशन, पंचायती राज, ग्रामीण विकास विभाग यांचा ही विशेष सहभाग घ्यावा.

## आंगणवाडी व शाळांमध्ये हात धुण्याचे प्रात्यक्षिकः

- सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांसोबत अंगणवाडी केंद्रामध्येही हात धुण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात यावे
- हात धुण्याच्या टप्प्यांविषयीचे पोस्टर्स प्रत्येक शाळांमध्ये तसेच अंगणवाडी केंद्रामध्येही हात धुण्याच्या ठिकाणी लावण्यात यावेत.
- दररोज प्रार्थनेच्या वेळी शाळेतील विदयार्थ्यांना हात धुण्याचे महत्वा विषयी माहिति देण्यात यावी.
- मध्यान्ह भोजनाच्या आधी सर्व विदयार्थ्यांना साबण व पाण्याने हात धुण्याविषयी शिकवावे.
- शाळेतील विदयार्थ्यांकडून हात धुण्याचे महत्व पटविण्यासाठी मोहिमेदरम्यान प्रभातफेरी काढण्यात यावी

## शहरी भागासाठी मोबाईल टीमः

- शहरी भागातील झोपडपट्‌टया स्थलांतरीत बालके, रस्त्यावर राहणारी बालके, अनाथ बालके व बालसुधार गृहातील बालके यांच्या पर्यंत पोहोचण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद कार्यक्षेत्रात मोबाईल टीम तयार करण्यात याव्यात.
- सदर भागांमध्ये पोस्टर्स, बॅनर्स, एफएम रेडिओ च्या माध्यमातून SDC कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी.

**खाजगी बालरोग तज्ञ आणि वैदयकीय व्यावसायिक यांना आयएपी /आयएमए च्या सहयोगाने त्यांच्या क्लिनिक आणि वॉर्डमध्ये ओआरएस/ झिंक कॉर्नर स्थापन करण्याकरीता तसेच जनजागृतीपर कार्यक्रम घेण्याकरीता प्रोत्साहीत करावे.**

## प्रसिध्दी साहित्य व जनजागृती:-

- Stop Diarrhoea Campaign कार्यक्रमाची उद्घाटन संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री/खासदार/जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा इतर वरिष्ठ अधिकारी यांचेमार्फत करण्याचे नियोजन करावे
- सदर कार्यक्रमाची जास्तीत जास्त प्रसिध्दी करण्याची जबाबदारी आपल्या जिल्हा विस्तार व संपर्क अधिकारी, (District Extension & Media Officer) यांची असेल.
- या कार्यक्रमाची सर्व स्तरावर प्रसिध्दी करण्यात यावी. सर्व आरोग्य संस्था, हेल्थ पोस्ट, ओआरटी कॉर्नर, तालुका स्तरावर इत्यादी ठिकाणी प्रसिध्दी साहित्य व प्रोटोकॉलस लावण्यात यावे.
- प्रत्येक गाव स्तरावर ओआरएस व झिंकचा वापराबाबत "आरोग्य संरक्षक भिंत" (हेल्थ वॉल) द्वारे पेटींग करुन संदेश दयावेत.
- पोस्टर, बॅनर, एफएम रेडिओ, दूरदर्शन व सोशल मिडीया याद्वांरे जास्तीत जास्त जनजागृती करण्यात यावी.
- जिल्हा पातळीवरुन मोहिमेच्या ३ दिवस आधी सर्व प्रसिध्दी साहित्य सर्व स्तरावर उपलब्ध करुन देण्यात यावे.

## प्रशिक्षण:-

- जिल्हा स्तरावर तालुका वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केद्र वैद्यकिय अधिकारी व वैद्यकिय अधिक्षक यांचे मासिक बैठकीमध्ये SDC चे नियोजन व तांत्रिक मार्गदर्शक सूचना या बाबतचे प्रशिक्षण घ्यावे.
- वैद्यकिय अधिकारी महानगरपालिका यांनी आपल्या मासिक सभेमध्ये आपल्या अंतर्गत असणाऱ्या सर्व वैद्यकिय अधिकारी यांचे मासिक बैठकीमध्ये SDC चे नियोजन व तांत्रिक मार्गदर्शक सूचना या बाबतचे प्रशिक्षण घ्यावे.
- प्राथमिक आरोग्य केंद्र व नागरी आरोग्य केंद्र स्तरावरील समुदाय आरोग्य अधिकारी, एएनएम व आशा यांना SDC चे नियोजन व तांत्रिक मार्गदर्शक सूचना या बाबत अवगत करण्यात यावे.

- ## सनियंत्रण व मुल्यमापन :-

### जिल्हास्तरीय

- सदर मोहिमेचे २ महिने संनियंत्रण व मुल्यमापन नियमितपणे करण्यात यावे. जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सकस्तरावरुन जिल्हयातील प्रत्येक तालुक्याचे संनियंत्रण व

मुल्यमापन करण्यासाठी प्रती तालुका एक अधिकारी नियुक्त करावा. हे कार्यक्रमाचे सनियंत्रण मुल्यमापन करतील.

### तालुकास्तरीय

- कार्यक्षेत्रामध्ये तालुका आरोग्य अधिकारी, तालुका समूह संघटक, तालुका समन्वयक यांनी आशा व एएनएमच्या कामकाजाचे मुल्यमापन व संनियंत्रण करावे.
- प्रत्येक तालुकास्तरावर तालुका आरोग्य अधिकारी, तालुका समूह संघटक, तालुका आरोग्य व्यवस्थापक यांनी क्षेत्रभेटी दयाव्यात. त्यांनी कमीत कमी १०% अंगणवाडया, ओआरटी कॉर्नर व २% ओआरएस वाटप केलेली घरे येथे भेटी देऊन मुल्यमापन करावे.
- प्रा.आ. केंद्र स्तरावर वैदयकीय अधिकारी व समुदाय आरोग्य अधिकारी यांनी सनियंत्रण करावे

### स्थानिक एनजीओ यांचा सहभागः

- आकांक्षित जिल्हे (Aspirational Districts), अतिजोखमीचा भाग, असमाधानकारक काम असलेले जिल्हे, अतिदुर्गम आणि आदिवासी तालुके, मागील वर्षी अतिसाराची साथ असलेले क्षेत्र या सर्व ठिकाणी ओआरएस व झिंक चे जास्तीत जास्त काम होण्यासाठी स्थानिक एनजीओ यांना सहभागी करुन घ्यावे.

### अहवाल सादरीकरणः-

- सदर कार्यक्रमाच्या अहवालासाठी ग्रामीण, शहरी व महानगपालिका स्तरावरील अहवाल सादर करावयाचा आहे.
- याकरीता ग्रामीण व शहरीची एक व महानगपालिकेसाठी एक असे दोन स्वतंत्र गुगल शीट तयार करण्यात आल्या आहेत.
- त्यानुसार **सदर गुगल शीट मध्ये दर आठवडयाला (सोमवारी) झालेल्या कार्यक्रमाचा अहवाल भरण्यात यावा.** सदर कार्यक्रमाचा अहवाल हा ग्रामीण व शहरी एकत्र व महानगरपालिका कार्यक्षेत्राप्रमाणे वेगवेगळा अद्यावयत करण्यात यावा.
- जिल्हा स्तरीय (ग्रामीण व शहरी) अहवाल भरण्याची जबाबदारी जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा समुह संघटक आणि महानगरपालिका स्तरीय अहवाल भरण्याची जबाबदारी आरसीएच ऑफीसर व शहर कार्यक्रम व्यवस्थापक यांची असेल.
- जिल्हास्तरीय (ग्रामीण व शहरी) आणि महानगरपालिका स्तरीय अहवाल हे गुगल शीटमध्ये वेळापत्रकानुसार भरले जातील याची खात्री जिल्हा स्तरावर जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगपालिका स्तरावर वैदयकीय आरोग्य अधिकारी यांनी करावी.
- **सदर कार्यक्रमाचा अहवाल हा केंद्र शासनास सादर करावयाचा असल्याने अहवाल गुगल शीट मध्ये दिलेल्या कालावधीत वेळेवर व अचूक भरला जाईल याची सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी दक्षता घ्यावी.**

# अतिसाराचे व्यवस्थापन व उपचार

अतिसाराबाबत माहिती घ्या

| | | |
|---|---|---|
| लक्षणे -<br>✓ सौम्य किंवा गंभीर जलशुष्कतेची कोणतीही लक्षणे नसल्यास | **लक्षणे (खालीलपैकी कोणतीही दोन)** -<br>✓ अस्वस्थपणा, चिडचिडेपणा<br>✓ डोळे खोल जाणे<br>✓ घटाघटा पाणी पिणे, तहानलेला<br>✓ त्वचेला चिमटा घेतला असता त्वचा हळूहळू पुर्ववत होणे | **लक्षणे (खालीलपैकी कोणतीही दोन)** -<br>✓ सुस्तावलेला किंवा बेशुध्द पडणे<br>✓ डोळे खोल जाणे<br>✓ पीऊ किंवा स्तनपान करु शकत नाही किंवा असमाधानकारक रित्या पित आहे.<br>✓ त्वचेला चिमटा घेतला असता त्वचा हळूहळू पुर्ववत होणे |
| जलशुष्कता नाही | सौम्य जलशुष्कता | गंभीर जलशुष्कता (शॉक) |
| **योजना अ प्रमाणे उपचार करा**<br>✓ आशाव्दारे गृहस्तरावर | **योजना ब प्रमाणे उपचार करा**<br>✓ एएनएम, सीएचओ, व्दारे आरोग्य वर्धीनी केंद्र व गृहस्तरावर | **योजना क प्रमाणे उपचार करा**<br>✓ वैदयकीयअधिकारी, सीएचओ व्दारे आरोग्य वर्धीनी केंद्र व प्रा.आ.केंद्र स्तरावर तसेच स्टाफ नर्स व्दारे आरोग्य संस्थेत |

## अतिसार व्यवस्थापन व उपचाराबाबत महत्वाचे संदेश

- अतिसार झाल्याबरोबर (एका दिवसामध्ये ३ पेक्षा जास्त वेळा जुलाब होणे ) लगेच ओआरएसचे द्रावण आणि इतर द्रव पदार्थ दया आणि अतिसार थांबेपर्यंत देत राहा.
- अतिसार असलेल्या बालकाला १४ दिवसापर्यंत झिंक गोळी दया. अतिसार होणे थांबले तरी गोळी देत राहा
- अतिसारामध्ये ओआरएस व झिंक देणे हे अतिसारावरील उपचाराची योग्य पध्दती असून अतिसार लवकर बरा होण्यास फायदेशिर आहे.
- बाळाची विष्ठेची लवकर आणि सुरक्षित प्रकारे विल्हेवाट करावी.
- अतिसारा दरम्यान जे बाळ स्तनपान घेत असेल त्याला स्तनपान सुरु ठेवा आणि अतिसारा दरम्यान व नंतरही जास्तीत जास्त स्तनपान दया.
- स्वच्छ हातांनी स्वच्छ व निर्जंतुक पाणी प्या.
- स्वयंपाक करण्यापुर्वी, बालकाला जेवण भरण्यापुर्वी तसेच बालकाची शी स्वच्छ केल्यानंतर आणि बालकाला साफ केल्यानंतर मातेने हात साबणाने स्वच्छ धुवून घ्यावे.
- खालील पैकी कोणतेही लक्षणे आढळल्यास बालकाला आरोग्य कर्मचाऱ्याकडे किंवा संस्थेमध्ये घेऊन जावे.
    - बालक अधिक आजारी होत असेल.
    - अस्वस्थपणा, चिडचिडेपणा
    - डोळे खोल जाणे.
    - घटाघटा पाणी पिणे.
    - स्तनपान करु शकत नसेल.
    - शौचामध्ये रक्त पडत असल्यास.
    - कमी पाणी पित असल्यास.
    - ताप येत असल्यास.
- अतिसाराबाबतच्या सल्ल्यासाठी आशा किंवा एएनएमशी संपर्क साधावा.